



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक




● वर्ष : ०१ ● अंक : २१६ ● शनिवार दि. १८ मे २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 116 ● Saturday, 18 May 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-





सुषमाच्या हातात उद्धव देई मशाल... 2





फ. मु. यांच्या कवितेतून विश्व कारुण्याचे... 4


# नकली शिवसेनेकडून फसवणूक

## शिवाजी पार्कवरील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घणाघाती टीका

**मुंबई (दै. आरंभ पर्व)** नकली शिवसेनेने शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि शिवसैनिकांना धोका दिला असल्याची घणाघाती टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. देशात घुसखोरी करणाऱ्यांना बाळासाहेबांनी कायम विरोध केला. पण उद्धव ठाकरे हे घुसखोरीचे समर्थन करणाऱ्यांबरोबर जाऊन बसले. त्यांनी महाराष्ट्राच्या मातीलाही धोका दिला, अशा शब्दांत मोदी यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता जोरदार हल्ला चढविला.

काँग्रेसला मागासवर्गीयांचे आरक्षण कमी करून ते मतांचा जिहाद करणाऱ्या अल्पसंख्याकांना द्यायचे आहे. पण धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यास घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विरोध होता. त्यामुळे मागासवर्गीयांचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना देण्याचा काँग्रेसचा



डाव म्हणजे संविधानाचा अपमान आहे. मी संविधान रक्षक असून हा डाव कदापीही यशस्वी होऊ देणार नाही, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या प्रचारासाठी दादर येथील शिवाजी पार्कवर महाविजय संकल्प सभेचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. गर्दीने खचाखच भरलेल्या शिवाजी पार्कवर मोदी यांनी 'मत (व्होट) जिहाद' हाणून पाडून 2047 मध्ये विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना मतदानाचे आवाहन केले. मत देताना मुंबईवरील हल्ल्यांच्या घटना आठवून शहिदांचा अवमान करणाऱ्यांविरोधात मत द्यावे, असे त्यांनी नमूद केले.

ठाकरे यांच्या शिवसेनेवर टीकास्त्र सोडताना मोदी म्हणाले, जनादेश मोडून ठाकरे यांनी राज्यात सरकार स्थापन केले आणि अयोध्येतील राममंदिराला विरोध करणाऱ्यांबरोबर गेले. अन्य देशांमधून भारतात आलेल्या हिंदू, बौद्धांना देशाचे नागरिकत्व देण्यास म्हणजे सीएएलाही ठाकरे यांनी विरोध केला. आपल्या विचारधारेत एवढे परिवर्तन झालेला दुसरा पक्ष आढळणार नाही. मुंबईतील विकास प्रकल्पांमध्येही ठाकरे यांनी अडथळे आणले. बुलेट ट्रेन, मालवाहतूक कॉरिडॉर, मेट्रो प्रकल्पांसह जनहिताचे अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प रोखले. ते आता शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा सुरू केले आहेत.

# 'राज'थाट कायम

## राज ठाकरे यांच्या मोंदीसमोर महाराष्ट्रासाठी मागण्या

येत्या 20 मे रोजी लोकसभा निवडणुकांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. त्याआधी महायुती आणि महाविकास आघाडीकडून सभांचा धडका लावण्यात आला. शिवतीर्थावर महायुतीची सभा पार पडली. या सभेला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची देखील उपस्थित होती. कारण मनसेच्या गुढीपाडव्याच्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी महायुतीच्या सरकारला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर पुणे, कोकण, कल्याण-डोंबिवली आणि आता मुंबई अशा महत्त्वाच्या मतदासंघामध्ये राज ठाकरेंनी सभा घेतल्या. मुंबईतल्या सभेत राज ठाकरेंनी पंतप्रधान मोदींसाठी भाषण केलं आणि त्यांच्यासमोर महाराष्ट्राच्या अपेक्षा ठेवल्या. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडवणीस आणि अजित पवार यांनी भाषणामध्ये



उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्याबद्दल बोलले. पण त्यांच्याबद्दल बोलायची गरज नाही. जे सत्तेत येणार नाहीत, त्यांच्याबद्दल काय बोलायचं?


दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**अर्जंट पाहिजेत**

**पेजिनेशन : १ जागा**
पेजिनेशनसाठी इन-डिझाईन, फोटोशॉप, कोरल येणे आवश्यक

**व्हिडिओ एडिटर : १ जागा**
कोणत्याही सॉफ्टवेअरमध्ये ट्रेंडिंगनुसार व्हिडिओ एडिट करता येणे आवश्यक

**अँकर : १ जागा**
मराठी आणि हिंदी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक

मोबा. : ७२७६३१४१४२


# 'ते उद्या 'संघा'लाही नकली म्हणतील!'

**मुंबई (दै. आरंभ पर्व)** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकटकाळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिलेल्या शिवसेनेला नकली शिवसेना म्हणणारे उद्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही 'नकली संघ' म्हणण्यास कमी करणार नाहीत, अशी बोचरी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी भाजपवर केली. 'लोकसत्ता लोकसंवाद' कार्यक्रमात बोलताना उद्धव यांनी, राज्यातील सर्व 48 जागा जिंकण्याच्या ईर्षेने ही निवडणूक लढवित असल्याचे सांगितले.

मुस्लीम तुष्टीकरण, मुस्लिमांच्या मतांसाठी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना तिलांजली दिली, नकली



शिवसेना अशा भाजपकडून सुरू असलेल्या प्रचाराला ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले. पंतप्रधान मोदी हे राज्यातील दौऱ्यात शिवसेनेला 'नकली शिवसेना' असे टोमणे मारतात. नकली शिवसेना कोणती हे निकालातून स्पष्ट होईल, असा टोमणा ठाकरे यांनी लगावला. रा. स्व. संघाच्या निष्ठावान कायकर्ते आणि स्वंयसेवकांना भाजपचे सध्याचे धोरण पसंत आहे का, असा सवाल त्यांनी केला. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर आपण रा. स्व. संघाला साथ देण्याचे आवाहन केल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

शिवसेना मुस्लिमांचा अनुनय करते, अशी टीका भाजपचे नेते करतात. मला कधी मुस्लिमांच्या मिरवणुकांमध्ये सहभागी होण्याचा अनुभव नाही. पण 'आपले बालपण मुस्लीम कुटुंबात गेले', असे मोदीच सांगतात. त्यांच्या ताटात जेवायचे मग त्यांनी गोवंश हत्याबंदी कशी केली, हे माहीत नाही, असा टोला ठाकरे यांनी लगावला. गेल्या 10 वर्षांत काय केले हे सांगण्यासाठी भाजपकडे कोणतेही मुद्दे नाहीत. प्रत्येक वेळी निवडणुका आल्यावर असे मुद्दे उकरून काढण्याची भाजपला सवयच आहे. आमच्यावर 'व्होट जिहाद'चा आरोप केला जातो. पण भाजपकडून 'व्होट गद्दार' केले जाते त्याचे काय, असा सवाल ठाकरे यांनी केला. शिवसेनेला हिंदुत्व शिकविण्याचा कोणी प्रयत्न करू नये. मोदींना हिंदुहृदयसम्राट व्हायचे आहे. पण हिंदुहृदयसम्राट एकच व ते म्हणजे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे. जनतेने त्यांना ही पदवी दिली होती. हिंदुहृदयसम्राट होता येत नाही ही तर त्यांची पोटदुखी आहे. त्यातूनच त्यांनी शिवसेना फोडली. त्याच शिवसेनाप्रमुखांचे छायाचित्र वापरून मते मागण्याची वेळ भाजप आणि मोदी यांच्यावर आली, अशी टीकाही ठाकरे यांनी केली.




# मोदींना हटविल्याशिवाय हा 'भटकता आत्मा' स्वस्थ बसणार नाही : शरद पवार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पदावरून हटविल्याशिवाय हा भटकता आत्मा स्वस्थ बसणार नाही, असे प्रत्युत्तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोदींना दिले. लोकांचा सहभाग असलेल्या या निवडणुकीत भाजपचा पराभव अटळ असून, हुकूमशाहचा पराभव करून संविधान व लोकशाही वाचविण्याचा निर्धार इंडिया आघाडीच्या नेत्यांनी केला. वांद्रे-कुर्ला संकुल मैदानावर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी इंडिया आघाडीची सभा आयोजित करण्यात आली आहे होती. सभेला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेसच अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आदी नेते उपस्थित होते. महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यातील निवडणुकीच्या निमित्ताने इंडिया आघाडीने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. 4 जूनला भाजपचा पराभव अटळ असल्याचा



सूर सर्वच नेत्यांनी आळवला. मुंबईतील ही निवडणूक प्रचाराची सभा इंडिया आघाडीच्या विजयाची नांदी ठरणारी आहे, असे उद्धव ठाकरे यांनी या विराट सभेचे वर्णन केले. काही दिवसांपूर्वी भटकती आत्मा अशी मोदींनी पवारांवर टीका केली होता. त्याला पवारांनी प्रचाराच्या अखेरीस उत्तर दिले.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जेरदार हल्ला केला. हा फुले, शाहू आंबेडकरांचा महाराज आहे, मोदी-शहा-अदानीचा होऊ देणार नाही असा इशारा त्यांनी दिला. नाशिकच्या सभेत मोदी हिंदू-मुस्लीम भाषा करू लागले, त्यावेळी एक शेतकरी उभा राहून म्हणाला कांद्यावर बोला. त्या शेतकऱ्याच्या प्रश्नाला मोदी उत्तर देऊ शकले नाहीत. हुकूमशहाची नजर कशी राक्षसी असते त्याचा अनुभव लोकांनी घेतला. या हुकूमशहाचा विषाणू पासून देशाला वाचवायचे आहे. 4 जूनला मोदी पंतप्रधान राहणार नाहीत, केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार येणार असा विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला. देशाच्या स्वातंत्र्यानंतर सर्वसामान्यांचे, लोकशाहीचे भवितव्य ठरविणारी ही निवडणूक आहे. सत्ताबदल केल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही, असे आवाहन शरद पवार यांनी केले. नरेंद मोदींनी चारसो पारची घोषणा दिली आहे, परंतु भाजप दोनशे पारही करणार नाही, देशात इंडिया आघाडीचे सरकार येणार, असा विश्वास खरगे यांनी व्यक्त केला. घाटकोपर येथे जाहिरात फलक कोसळून 18 मुंबईकर नागरिकांचा बळी गेला. मोदी यांनी दुसऱ्या दिवशी त्या परिसरात रोड शो केला. दुर्घटनेतील जखमींची चौकशी करण्याचे सौजन्य त्यांनी दाखवले नाही. इतका असंवेदनशील प्रधानमंत्री जगाच्या पाठीवर दुसरा नसेल, असा दावा खरगे यांनी केला.

### खोटे बोलणे ही मोदींची गॅरंटी : खरगे

खोटे बोलणे, महागाई वाढवणे, रडून सहानुभूती मिळवणे, भ्रम पसरवणे, खोटी स्वप्ने दाखवणे, काँग्रेसला शिव्याशाप देणे, कारवाईची भीती दाखवणे ही नरेंद्र मोदी यांची गॅरंटी असून ते खोट्यांचे सरदार आहेत, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली.





# सुषमाच्या हातात उद्धव देई मशाल, बापाचे कार्य बुडवूनिया



हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरें नंतर शिवसेनेची पार दैना होताना या महाराष्ट्राने पाहिली. गोष्टी तिथेच थांबल्या नाहीत तर त्यांचे सुपुत्र उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'बाळासाहेबांच्या शिवसेनेला' काही स्वाभिमान तरी उरला आहे का असा प्रश्न आता उभा रहीला आहे. बाळासाहेबांनंतर या गोष्टीसाठी कायमच शिवसेनेकडे वेगवेगळी कारणे होती. आताचे ताजे कारण म्हणजे 'सुषमा अंधारेंची' त्यांच्याच पक्षाची प्रवक्ती म्हणून नियुक्ती करणे. या विषयाची 'irony' अशी की ही बाब महाराष्ट्रासमोर मांडणारा बाळासाहेबांचाच पुतण्या 'राज ठाकरे', ज्याच्याकडे, सर्वांची अपेक्षा असूनही, बाळासाहेबांनी शिवसेनेचे नेतृत्व हस्तांतर केले नाही. राज ठाकरेंच्या 'लाव रे तो व्हिडिओ' मुळे जरी सर्वांना सुषमा अंधारेंनी बाळासाहेबांच्या केलेल्या अपमानाची आठवण झाली असली तरी, सुषमा अंधारेंनी लावलेले दिवे हे तेवढ्या पुरते नव्हेत. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांना धरून चालणारी शिवसेना 'उद्धव ठाकरेंच्या' नेतृत्वाखाली सुषमा अंधारेंना प्रवक्ती म्हणून नियुक्त करते. ही गोष्ट केवळ पक्ष नाही तर उद्धव ठाकरेंच्या राजकीय कारकीर्दीचा हिशोबाने किती घातक ठरू शकते यांचे दर्शन आपल्याला येथे होईल. जे उद्धव ठाकरे सर्व सभांमध्ये हे रडत फिरतात की "माझे वडील चोरले" ते आपल्या वडिलांचा अनादर करणाऱ्या व्यक्तीचे पक्षात स्वागत कसे करू शकतात? ती व्यक्ती जीने बाळासाहेब ठाकरेंचा अपमान केला आणि त्यांची माफी न मागता, निर्लज्जपणे त्या गोष्टीचा माज केला...त्याच व्यक्तीला बाळासाहेबांचा सुपुत्राने कसे काय पक्षामध्ये घेतले? आणि फक्त पक्षामध्ये घेतले नाही तर प्रवक्ते बनवले, हेच का तुमचे वडिलांवरचे प्रेम? जर खरेच तुमचे तुमच्या वडिलांवर प्रेम असते तर तुम्ही अशा व्यक्तीला कधीच माफ केले नसते..

उद्धव ठाकरे यांनी सुषमा अंधारेंना पक्षात स्थान देऊन, हे सिद्ध केले की त्यांच्या साठी सत्ता महत्वाची आहे. वडिलांचा आदर, सन्मान वगैरे सर्व दुय्यम येते. तेच वडील ज्यांच्या विचारांवर त्यांचा पक्ष उभा असल्याचा दावा उद्धव ठाकरे करतात. भगवान राम आणि कृष्णावर यांच्यावर विश्वास नसणाऱ्या सुषमा अंधारे यांनी हसत हसत विधान केले की 'राम' देव कसा असू शकतो? रावणाच्या लंकेत 14 वर्षांच्या वास्तव्याबद्दल कोणीतरी शंका उपस्थित केल्यामुळे त्याला त्याची पत्नी सीतेवर संशय होता. जंगलात 14 वर्षे घालवलेल्या रामाबद्दलही आपण प्रश्न उपस्थित करू शकतो.. राम सुद्धा शबरी सोबत बोरे चाखत होता," अशी अश्लील रित्या सूचक वक्तव्य सुषमा अंधारेंनी केली आहेत. भगवान कृष्णाने आपल्या आयुष्यात महिलांची छेड काढली तरीही लोक त्याची पूजा का करतात असा सवाल त्यांनी केला. "तो (भगवान कृष्ण) स्त्रियांना आंघोळ करताना पाहत असे, तो त्यांचे कपडे चोरायचा आणि बाजारात त्यांचा विनयभंग करायचा,तरीही लोक त्याची पूजा का करतात" - सुषमा अंधारे

अंधारे यांनी हिंदू संतांवर ताशेरे ओढले की, त्यांनी म्हशींच्या बोलण्यासारखे चमत्कार घडवून जनतेला शिक्षण नाकारले. देवाधिदेव महादेव बद्दल अपमानास्पद रीतीने बोलताना अंधारे म्हणाल्या, "भस्मासुरने भोळे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महादेवाला प्रसन्न करण्यासाठी तपस्या केली असे म्हणतात. महादेव इतके भोळे आहेत की त्याच्यापासून मुलगा झाला हेही त्याला माहीत नव्हते" (भगवान गणेशाच्या जन्माचा संदर्भ). ज्या व्यक्तीने मर्यादा पुरूषोत्तम श्री रामांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले, श्री कृष्ण यांना स्त्रीलंपट म्हणून संबोधिले, महाराष्ट्राची कुलदैवत तुळजाभवानी यांची अवेलना करते, अशा सुषमा अंधारे ला तुम्ही तुमच्या पक्षामध्ये घेता आणि वर आम्ही हिंदुत्वाचा काय अपमान केला आहे, याचे निर्लज्जपणे पुरावे मागताना काही कसे वाटत नाही. संत एकनाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज, प्रभू रामचंद्र, हनुमानाची इज्जत काढली ह्या हिंदू बद्दल च्या भावना ह्यांच्या विचारात आहेत आणि ही वृत्ती जाणार नाही. कुत्र्याची शेपूट कधीच सरळ होत नाही...

महाराष्ट्राच्या पावन भूमीवर जन्माला येऊन सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोषा ऐकून ज्यांना त्रास होतो, अशा सुषमा अंधारेला उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या पक्षात स्थान देऊन, बाळासाहेबांचा आणि त्यांच्या विचारधारेचा पदोपदी अपमानच केला आहे. एखादी मराठी व्यक्ती जी अल्ल्हा चे गुन गाणं एवढ्या गर्वाने गाते, परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार ऐकायला जिला एवढा त्रास होतो, आणि तीच व्यक्ती हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंचे सुपुत्र "उद्धव ठाकरे" यांच्या पक्षाची प्रवक्ती बनते, या पेक्षा दुर्दैवी दुसरी कोणतीच गोष्ट नाही. हाच का बाळासाहेबांचा वारसा? सुषमा अंधारे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवासेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर सुद्धा टीका केली आहे. ज्या व्यक्तीने तुमच्या अब्रू चे जाहीर सभेत धिंडवले उडिवले, अशा स्त्रीला तुम्ही सत्ते पाई तुमचा स्वाभिमान विकत ठेऊन, तुम्ही माफ केले .. हीच तुमची निष्ठा?

बाळासाहेबांच्या नावाने मत मागायची, सहानुभूती जमवायची आणि सतत साहेबांचा अपमान करणाऱ्यांना पक्षात मोठं स्थान द्यायचं. उद्धव ठाकरे, संजय राऊत फक्त फायद्यासाठी बाळासाहेबांचा वापर करत आहेत म्हणा ज्या व्यक्तीने स्वतःच्या वडिलांनाच अपमान करणाऱ्या सुषमान अंधाराला खांद्यावर घेऊन नाचवले, अश्या उद्धव ठाकरे करून अजून कायच अपेक्षा आपण करणार आहोत? अशी कायच लाचारी आहे उद्धव ठाकरे यांची हि पवारांचं माहिती.

## अंमली पदार्थांचे इंजेक्शन देऊन दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)** दोन युवकांनी अंमली पदार्थांचे इंजेक्शन देऊन ओळखीच्या असलेल्या दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्याची घटना शहरात उघडकीस आली. लॉजवर नेऊन बिअर आणि दारू प्यायला देऊन रात्रभर त्या अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्याचा भयानक आणि किळसवाणा प्रकार राजगुरूनगर शहरात घडला असल्याचे समोर आले आहे. दोन्ही संशयीत आरोपींविरोधात खेड पोलीसांनी पॉस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून दोघांना ताब्यात घेतले आहे. या घटनेबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना मागील महिन्यात दि. 27 व 28 एप्रिल रोजी घडली. संशयीत अजय भिकेन दौड (वय 29, रा. सातकरस्थळ, ता. खेड) व श्रीराम संतोष होले, (वय 23, रा. होलेवाडी, ता. खेड) या दोघांनी ओळखीच्या अल्पवयीन मुलींना आपण फिरायला जावु असे म्हणुन त्यांना शिरूर येथे नेले. तिथे अंमली पदार्थ पुरविणारा आरोपी किरण (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही) याच्या कडुन अंमली पदार्थांचे इंजेक्शन घेऊन पाबळ येथे डोंगरावर निर्जनस्थळी मुलींना नेण्यात आले. तिथे अंमली पदार्थांचे इंजेक्शन देण्याचा प्रयत्न केला. मुलींनी इंजेक्शन घेण्यास नकार देतास धमकी देऊन हातावर इंजेक्शन देण्यात आले. पुढे खेड तालुक्यातील जैदवाडी गावच्या हद्दीत एका लॉजवर जावुन तेथे लॉजच्या दोन खोल्या घेऊन आरोपी अजय दौड याने एका अल्पवयीन मुलीला एका खोलीत नेले. तसेच आरोपी श्रीराम होले याने दुस-या मुलीला दुसऱ्या खोलीत नेले. दोघींनाही दारू पाजुन दोघांनीही जबदस्तीने बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी नशेच्या अंमलाखाली मुली घरी परत आल्यावर पालकांच्या लक्षात हा प्रकार आला. त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. मुलींनी फिर्याद देताच खेड पोलिसांनी आरोपींना अटक केली. आरोपींना दोन दिवस पोलीस कोठडी देण्यात असून पुढील तपास सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे यांनी सांगितले.

## 65 वर्षीय महिलेचा मृत्यू

**उरूळी कांचन (दै. आरंभ पर्व)** जोराचा वादळी वारा व विजेच्या कडकडाटासह अचानक आलेल्या पावसामुळे अडोशाला थांबलेल्या महिलांच्या बाजुलाच विज पडल्याचा मोठा आवाज झाल्याने तीन महिला भेदरल्याची घटना घडली आहे. या घटनेत एक 65 वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर दोघीजण किरकोळ जखमी झाल्या आहेत. शुक्रवारी (ता. 17) सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास खामगाव टेक (ता. हवेली) शिवारात हि घटना घडली आहे. अंजना बबन शिंदे (वय - 65रा. शिंदवणे, ता. हवेली) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे.

तर सुनीता महादेव डोंगरे (वय- 56), व संध्या गाडेकर (वय - 45, रा. दोघीही, पांढरस्थळ, उरूळी कांचन, शिंदवणे रोड, ता. हवेली) अशी किरकोळ जखमी झालेल्या दोघींची नावे आहेत. अंजना शिंदे व त्यांच्या बरोबर उरूळी कांचन व शिंदवणे परिसरातील 11 महिला या शेतातील कामानिमित्त खामगाव टेक या ठिकाणी शेतातील कामे करण्यासाठी गेल्या होत्या. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास काम संपवून घरी निघाल्या असतानाच अचानक विजेच्या कडकडाटासह जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू झाल्याने सर्वजण एका आडोशाला थांबल्या. नेमके याच वेळी ते ज्या ठिकाणी थांबले होते त्यांच्या काही अंतरावर असलेल्या ठिकाणी वीज कडाडली. या विजेच्या मोठ्या आवाजाने वरील तीन महिला जागेवरच बेशुद्ध पडल्या. त्यांना खाजगी वाहनातून उरूळी कांचन येथील प्राथमिक आरोग्य या ठिकाणी दाखल करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासले.

यावेळी अंजना शिंदे यांना पुढील उपचारासाठी उरूळी कांचन येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर जखमी असलेल्या सुनीता डोंगरे व संध्या गाडेकर यांच्यावर उपचार करून सोडून देण्यात आले. यावेळी उपचारादरम्यान अंजना शिंदे यांचा मृत्यू झाल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली. शिंदे यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. या घटनेने शिंदवणेसह परिसरातील गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी रात्री शिंदवणे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## बालभारती पौडफाटा रस्त्यावरून राजकारण तापले

**पुणे (दै. आरंभ पर्व)** बालभारती ते पौड फाटा या संदर्भात भाजपाने स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार 'मोजक्या लोकांना' याचा फायदा व्हावा, या उद्देश्यानेच वेताळ टेकडीवर रस्ता करण्याचा घाट घातला होता. याला मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला. यावर भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी समंजस भूमिका घेत असल्याचे जाहीर करताना, स्थानिकांची मते पदरात पाडून घेतली. निवडणूक संपताच पुन्हा एकदा हुकूमशाही प्रवृत्ती दाखविताना 'डंके की चोट पर' हा रस्ता करून दाखविणार असे ट्वीट केले. यामुळे मते पदरात पाडून घेण्यासाठी भाजपा किती खालच्या मानसिकतेने काम करतो असे स्पष्ट होत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहरप्रमुख गजानन थरकुडे यांनी केला. भाजपाने गेल्या पाच वर्षात महानगरपालिकेत सत्ता रबविताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला.

## मुंबईला 3 वर्षे पुरेल एवढ्या पाण्याची वाफ!

**पुणे (दै. आरंभ पर्व)** राज्यातील मोठ्या, मध्यम आणि लघुसिंचन प्रकल्पातून दरवर्षी 165 टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याची आकडेवारी समोर आली आहे. सरकारच्या जलसंपदा विभागाने तयार केलेल्या 'पाणी लेखापरीक्षण अहवाला'नुसार पुण्याला नऊ वर्षे, तर मुंबईला तीन वर्षे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकेल, एवढ्या पाण्याची वाफ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पाण्याद्वारे 8.25 लाख हेक्टरवरील शेतीचे सिंचन होऊ शकले असते. राजस्थान आणि महाराष्ट्रातील बाष्पीभवनाचा दर सर्वाधिक आहे. राज्याच्या पाणी लेखापरीक्षण अहवाल 2021-22 नुसार मोठे, लहान व मध्यम प्रकल्पांची एकूण पाणीसाठवण क्षमता सुमारे 1,496 अब्ज घनफूट (टीएमसी) असून त्यापैकी सुमारे 11 टक्के (165 टीएमसी) पाण्याचे एका वर्षात बाष्पीभवन होते. विदर्भात 2.5 ते 3 मीटर, मराठवाड्यात 2 ते 2.75 मीटर, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रात 1.5 ते 1.75 मीटर तर कोकणात 0.80 मीटर पाण्याचे दरवर्षी बाष्पीभवन होते.

केवळ तापमान वाढीमुळे बाष्पीभवनाचा वेग वाढतो, हा समजही चुकीचा आहे. तापमानाबरोबरच क्षेत्रफळ (पाणी पसारा), वातावरणातील बाष्पाचे प्रमाण, वाऱ्याचा वेग आणि पाण्याची खोली यांचाही परिणाम होतो.

## 16 व 17 जूनला भीमथडी मराठी साहित्य संमेलन

**उरूळी कांचन (दै. आरंभ पर्व)** राज्यस्तरीय तिसरे भीमथडी मराठी साहित्य संमेलन रविवार दि.16 व सोमवार दि.17 जून 2024 रोजी केडगाव, चौफुला (ता. दौंड) येथे होत आहे. या साहित्य संमेलनात उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण, ग्रंथदिंडी, परिसंवाद, प्रकट मुलाखत, कथाकथन, नाट्यप्रयोग, सांस्कृतिक, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत अशी माहिती संमेलनाचे मुख्य प्रवर्तक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली. अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य परिषद यांच्या वतीने दरवर्षी

भीमथडी मराठी साहित्य संमेलन

संमेलनाचे आयोजन करण्यात येते. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला भीमथडी मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष रविंद्र खोरकर, सचिव दीपक पवार, परिषदेचे सदस्य कैलास आबा शेलार, राजाभाऊ जगताप, मोहन जाधव, रामचंद्र नातू, महाराष्ट्र राज्य तमाशा थिएटर मालक संघटनेचे अध्यक्ष डॉ.अशोकराव जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान अध्यक्ष विनायक कांबळे, झोपडपट्टी सुरक्षा दल पुणे जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय डाडर, रानकवि जगदीश वनशिव, भाऊसाहेब फडके, नितिन भागवत, आनंदा बारवकर, बाळासाहेब मुळीक, सुशांत जगताप आदी उपस्थित होते.

या साहित्य संमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राहुल कुल, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक रमेश आप्पा थोरात, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ.दिगंबर दुर्गाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते विजयराव कोलते, जिल्हा अध्यक्ष भाजप वासुदेव काळे, महेश भागवत, सागर फडके, नितिन दोरगे, माउली ताकवणे, राजाभाऊ तांबे, वसंत साळूखे, तानाजी केकाण, महेश पासलकर, डॉ.भरत खळदकर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ.लक्ष्मण हेंबाडे, आप्पासाहेब पवार, वैशाली नागवडे आदी उपस्थित राहणार आहेत. दोन दिवस चालणा-या या साहित्य संमेलनात मुक्कामी राहण्याची व जेवणाची सोय करण्यात येणार आहे. साहित्य संमेलनात सहभागी होण्यासाठी कवी, लेखक, कलावंत यांनी 9881098481, 8805511060, 9850206977 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन भीमथडी मराठी साहित्य परिषद अध्यक्ष संजय सोनावणे व सचिव दीपक पवार यांनी केले आहे.

## बापू नायर टोळीतील गुंडाने कारागृहातून खंडणी वसूल केल्याचा प्रकार

### कोल्हापूर कारागृहातून १४ मोबाइल क्रमांकाचा वापर

**पुणे (दै. आरंभ पर्व)** बिबवेवाडीतील इंदिरानगर परिसरात दहशत असलेला बापू नायर टोळीतील गुंड तबरेज सुतारने कारागृहातून 13 लाखांची खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी खंडणी विरोधी पथकाने दोघांना पकडले. तबरेज सुतारने कोल्हापूर कारागृहातून 14 मोबाइल क्रमांकाचा वापर करून खंडणी उकळल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी तबरेज मेहबूब सुतार (रा. कात्रज), अविनाश नामदेव मोरे (रा. सहकारनगर), सागर किसन धुमाळ (रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी), कुमार उर्फ पप्पू सायकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका व्यावसायिकाने फिर्याद दिली आहे. मोरे आणि धुमाळ यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तबरेज सुतार सध्या नागपूर कारागृहात आहे. त्याच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी असे गंभीर स्वरूपाचे सात गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी तबरेजला कोल्हापूर कारागृहात ठेवण्यात आले होते. त्याने कोल्हापूर कारागृहातून वेगवेगळ्या क्रमांकावरून व्यावसायिकाशी संपर्क साधून दहा लाखांची खंडणी उकळली होती. त्याने व्यावसायिकाला 30 लाख रुपयांची खंडणी मागितली होती. खंडणी न दिल्यास तीन गुंठे जमीन नावावर करून देण्यास सांगितले होते. व्यावसायिकाने नकार दिल्यानंतर त्याच्या घरी गुंड पाठविण्यात आले होते. गेले दोन वर्षे तबरेज व्यावसायिकाला धमकावत होता. अखेर घाबरलेल्या व्यावसायिकाने खंडणी विरोधी पथकाकडे तक्रार दिली. व्यावसायिक पूर्वी तबरेजच्या मोटारीवर चालक म्हणून काम करत होता. 2017 मध्ये तबरेज एका गुन्ह्यात फरार झाला होता. त्यानंतर तबरेजकडे काम करणाऱ्या चालकाने जमीन खरेदी विक्री व्यवहार सुरू केला. जमीन खरेदी विक्री व्यवहारात त्याचा जम बसला. 2022 मध्ये खून प्रकरणात तबरेजला अटक करण्यात आली होती.

## थोडक्यात




### पिंपरी : एका वर्षात अडीच हजार श्वानांचा मृत्यू

**पिंपरी (आरंभ पर्व) :** महापालिकेच्या नेहरूनगर येथील प्राणी शुश्रूषा केंद्रात आता मोठ्या प्राण्यांसाठीही दहनयंत्राची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे. दरम्यान, एका वर्षात अडीच हजार श्वानांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. पिंपरी-नेहरूनगर येथे महापालिकेच्या वतीने शहरात प्राणी शुश्रूषा केंद्रात (ॲनिमल शेल्टर हाऊस) भटक्या आणि पाळीव प्राण्यांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्राणी शुश्रूषा केंद्राच्या माध्यमातून पाळीव, भटक्या श्वानांना उपचार दिले जातात. याच ठिकाणी श्वानांसाठी दहन यंत्र बसविण्यात आले आहे. मात्र, मोठ्या प्राण्यांसाठी अशी यंत्रणा उपलब्ध नव्हती. त्यामुळे ते प्राणी पुण्यातील दहनयंत्रामध्ये पाठविण्यात येत होते. मात्र, आता शहरातील मोठ्या प्राण्यांसाठी दहनयंत्राची सोय करण्यात आली आहे. मोठ्या पाळीव प्राण्यांसाठीचे दहन मशीन बसविण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे. या मशीनमध्ये दहनासाठी प्राण्यांच्या वजनानुसार वेळ लागणार आहे. साधारण तीन तासांत मोठ्या प्राण्याचे दहन होईल, असे पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने सांगण्यात आले. 2023 मे ते एप्रिल 2024 पर्यंत दोन हजार 580 श्वानांचे दहन करण्यात आले. यामध्ये पाळीव आणि रस्त्यावरील श्वानांचा समावेश आहे. मे 2023 मध्ये यंत्रामध्ये बिघाड झाल्याने श्वानांसाठीचे नवीन यंत्र बसविण्यात आले होते. शहरात पाळीव प्राण्यांची संख्या लक्षणीय आहे. दर महिन्याला साधारण 35 ते 40 मोठे प्राणी दहनासाठी येतात. त्यामुळे ही संख्या मोठी असून शहरात अद्ययावत यंत्राची आवश्यकता होती. पाळीव प्राण्यांमध्ये गाय, म्हैस, बैल, घोडा या प्राण्यांसाठीदेखील दहन यंत्र असावे, अशी नागरिकांची मागणी होती. त्यानुसार अद्ययावत आणि पर्यावरणपूरक यंत्र बसविण्यात आले आहे. हे मशीन सीएनजी गॅसवर चालते.



### शनिवारी, रविवारी एक्स्प्रेस-वे वापरताय?

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर 'हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' अंतर्गत पुणे वाहिनीवर किलोमीटर क्र. 27 आणि कि.मी. क्र. 55 येथे 18 आणि 19 मे या दोन दिवशी कमानीची (गॅन्ट्री) तांत्रिक तपासणी, दुरूस्ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे वाहिनीवरील सर्व प्रकारच्या वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुणे वाहिनीवर 18 मे रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 12 वाजेपर्यंत वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. या कालावधीत द्रुतगती मार्गावरील सर्व वाहने शेडूंग, खोपोली मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र. 48 येथून पुण्याकडे वळविण्यात येणार आहेत. तसेच 19 मे रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 12 वाजेपर्यंत वाहतूक पूर्णपणे बंद करून द्रुतगती मार्गावरील सर्व वाहने कुसगाव पथकर नाक्यावरून राष्ट्रीय महामार्ग क्र. 48 येथून देहूरोड मार्गे पुण्याकडे वळविण्यात येणार आहे. या अनुषंगाने वाहनचालकांनी प्रवासाचे नियोजन करावे, या कालावधी दरम्यान द्रुतगती मार्गावरील वाहनचालकांना अडचण असल्यास त्यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी 9822498224 किंवा महामार्ग पोलीस विभागाच्या 9833498334 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे रस्ते महामंडळाने सांगितले.

# मुदतपूर्व जन्मलेल्या व कमी वजनाच्या बाळावर यशस्वी बलून एओर्टोप्लास्टी प्रक्रिया

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरमधील डॉक्टरांच्या बहुविभागीय टीमने नुकतेच जन्मजात हृदयरोग असलेल्या , मुदतपूर्व जन्मलेल्या व कमी वजनाच्या बाळावर यशस्वीरित्या बलून एओर्टोप्लास्टी प्रक्रिया केली. या बाळाला कोअॅर्कटेशन ऑफ एओर्टा (हृदयातून शरीराला रक्तपुरवठा करणाऱ्या डाव्या कप्प्यातील प्रमुख रक्तवाहिनीमध्ये अडथळा) या स्थितीचे निदान झाले होते. या जीवनदायी प्रक्रियेमुळे आणि 20 दिवसांच्या अतिदक्षता विभागातील देखभालीनंतर आता बाळ सुखरूप घरी गेले आहे.याबाबत माहिती



देताना नवजात शिशु तज्ज्ञ (निओनेटोलॉजिस्ट) व एनआयसीयू मधील अॅकेडेमिक्स विभागाचे प्रमुख डॉ.अनिल खामकर म्हणाले की,नजिकच्या एका रुग्णालयातून 1500 ग्रॅम अशा कमी वजनाच्या व मुदतपूर्व जन्मलेल्या बाळाला जन्मानंतर दोन तासांतच आमच्या रुग्णालयात घेऊन येण्यात आले. आईच्या पोटात असताना या बाळाच्या हृदयाच्या ठोक्यांमध्ये अनियमितता असल्याने सिझेरियन सेक्शन करण्यात आले व प्रसूती साडेसात महिन्यात (32.5 आठवड्यात) झाली होती. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर बाळाची परिस्थिती अस्थिर होती. श्वसनाचा त्रास होत होता. प्राणवायू आणि रक्तदाबाची पातळी कमी झाली होती.

2डी इको द्वारे कोअॅर्कटेशन ऑफ एओर्टा या स्थितीचे निदान झाले.

ही स्थिती असलेले लहान बाळ काही दिवस स्थिर असते,कारण पेटंट डक्टस आर्टेरिओसस (पीडीए) च्या द्वारे रक्ताभिसरणाला पर्यायी मार्ग मिळतो. (डक्टस आर्टेरियोसस (डीए) ही एक एओर्टा आणि फुफ्फुसातील रक्तवाहिन्यांना जोडणारी गर्भाची वाहिनी असते.) डक्टसमुळे जन्माच्या आधी ही वाहिनी रक्ताला फुफ्फुसापासून दूर नेते. प्रत्येक बाळ हे डक्टस आर्टेरिओससह जन्मते. जन्मानंतर याची गरज नसल्यामुळे पहिल्या काही दिवसात अरुंद होऊन बंद होते. नोबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमधील वरिष्ठ बालहृदयरोग तज्ञ डॉ.प्रभातकुमार म्हणाले की, पीडीए 10 दिवसांनी अरुंद झाल्याने बाळाला श्वसनाचा त्रास व्हायला लागला आणि हृदयाचे कार्य बंद पडू लागले. बाळाला वाचविण्यासाठी अरुंद झालेल्या एओर्टामध्ये बलून डायलेटेशन (फुगा टाकून फुगविणे) ही प्रक्रिया करून रक्तप्रवाह पूर्ववत करणे हा एकमेव मार्ग होता.

12व्या दिवशी आमच्या कार्डियाक कॅथलॅबमध्ये बलून डायलेटेशन ऑफ कोअॅर्कटेशन ही प्रक्रिया करण्यात आली. या प्रक्रियेमध्ये रक्तवाहिनीत अरुंद झालेल्या भागात एक फुगा टाकण्यात येतो.नंतर तो फुगा हळूहळू फुगवत अरुंद झालेली वाहिनी मोठी करण्यात येते.

या प्रक्रियेमध्ये भूलतज्ञ डॉ.निलेश वसमतकर आणि त्यांची टीम तसेच निओनॅटोलॉजी फेलो डॉ.रोहित बोरकर यांचे सहकार्य लाभले. नवजात शिशु तज्ज्ञ (निओनेटोलॉजिस्ट) व एनआयसीयू मधील अॅकेडेमिक्स विभागाचे प्रमुख डॉ.अनिल खामकर म्हणाले की,1500 ग्रॅम इतक्या कमी वजनाच्या बाळावर अशी प्रक्रिया करणे अतिशय दुर्मिळ असून यामध्ये कुशलता,अनुभव आणि सांघिक कार्य अत्यंत महत्त्वाचे असते.या प्रक्रियेला सुमारे दोन तास कालावधी लागला.ही प्रक्रिया यशस्वी झाली आहे की नाही हे शोधण्यासाठी 2डी इको ही मानक चाचणी मानली जाते आणि त्यामध्ये रक्तवाहिनी यशस्वीरित्या खुली होऊन रक्तप्रवाह सामान्य झाल्याचे दिसून आले. पेडियाट्रिक्स विभागाचे प्रमुख डॉ.पी.डी.पोटे म्हणाले की,अशा कमी वजनाच्या आणि आजारी असलेल्या बाळांसाठी आमच्या एनआयसीयू टीमतर्फे सर्वसमावेशक उपचार प्रदान केले जातात. या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार आमच्या टीममध्ये समाविष्ट असून या टीममध्ये डॉ.अभय महिंद्रे,डॉ.अनिल खामकर,डॉ.सुमित भावसार यांचा समावेश असून डॉ.संतोष,डॉ.सुजाता,डॉ.रोहित,डॉ.संगीता,डॉ.स्मिता यांसह परिचारिकांचा खंबीर पाठिंबा असतो. नोबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे कार्यकारी संचालक डॉ.एच.के.साळे म्हणाले की, या यशस्वी कामगिरीतून अशा प्रकारच्या आव्हानात्मक स्थितीमध्ये महत्वाच्या असलेले बहुविभागीय टीमचे प्रयत्न आणि समन्वय प्रतिबिंबित होतो. नोबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने म्हणाले की, किफायतशीर दरात प्रत्येकाला उत्कृष्ट दर्जाची एकात्मिक आरोग्य सेवा प्रदान करणे हे आमचे ध्येय आहे.

## थोडक्यात



### मोशीतील कोसळलेल्या होर्डिंगसंदर्भात दोघांवर गुन्हा दाखल

**पिंपरी (आरंभ पर्व) :** वादळी वाऱ्यामुळे पडलेल्या मोशीतील होर्डिंगच्या मजबुतीकरणाच्या दाखल्याची मुदत संपल्याचे समोर आले असून या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आनंद रमणलाल गांधी (वय 38, रा. महर्षीनगर, पुणे) आणि हेमंत कुमार शिंदे (रा.कात्रज) या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाचे कार्यालयीन अधीक्षक ग्यानचंद भाट यांनी भोसरी, एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मोशी येथील गणेश साम्राज्य चौकात आनंद पब्लिसीटीचे 40 फुट बाय 20 फुटाचे होर्डिंग उभारण्यात आले होते. गुरूवारी वादळी वाऱ्यामुळे हे होर्डिंग कोसळले. त्यामध्ये दोन दुचाकी आणि एका टेम्पोचे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. होर्डिंग अधिकृत असले, तरी जाहिरात फलकाची आणि होर्डिंगच्या मजबुतीकरणाच्या दाखल्याची मुदत संपली होती. त्याचे नुतनीकरण केले नाही. मानवीजीवित आणि व्यक्तीगत सुरक्षा धोक्यात येईल असे बेदरकारपणे, हयगय केल्याचे कृत्य केल्याचा ठपका ठेवता दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. भोसरी पोलीस तपास करत आहेत.

# आई व परिचारिकांचे कार्य अतुलनीय, अमूल्य : सुषमा चोरडिया

- सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसच्या वतीने आंतरराष्ट्रीय मातृदिन व परिचारिका दिन उत्साहात साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आई आणि परिचारिका दोघीही सेवा व समर्पणाचे प्रतीक आहे. मूल घडवण्यात आईचे व रुग्णसेवेत परिचारिकेचे योगदान अमूल्य आहे. कुटुंबाची व रुग्णाची सेवा दोघीही तन्मयतेने करतात. या दोघींचे अस्तित्व प्रत्येकाच्या मनात सर्वोच्च स्थानी आहे. त्यांच्या कार्याची तुलना अथवा गुणांकन होऊ शकत नाही. त्यांचे कार्य अतुलनीय व अमूल्य आहे," असे प्रतिपादन सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्षा व सूर्यदत्त वुमेन्स आंत्रप्रेन्युअरशीप लीडरशीप अकॅडमीच्या अध्यक्षा सुषमा चोरडिया यांनी व्यक्त



केले. काळजी, सेवा, प्रेम आणि निःस्वार्थ मदत करण्याच्या वृत्तीमुळेच आई आणि परिचारिकेचे समर्पण आणि वचनबद्धता स्पष्टपणे दिसत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसच्या वतीने आंतरराष्ट्रीय मातृदिन आणि परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी 12 मे रोजी हे दोन्ही दिवस जगभर साजरे करण्यात येतात. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. फ्लोरेन्स नायटिंगल यांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

बावधन येथील 'सूर्यदत्त'च्या कॅम्पसमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नर्सिंग महाविद्यालयांना सल्लागार म्हणून कार्यरत एस. ऋषिकेश, 'सूर्यदत्त'च्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, कार्यकारी विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल, प्रशांत पितालिया, शीतल फडके, रोहित संचेती, प्राचार्य डॉ. सिमी रेठरेकर, प्राचार्य सायली पांड्ये, प्राचार्य हेमंत जैन, सविता मटाने, नयना गोडांबे, रोशनी जैन, मारुती मारेकरी, बाटु पाटील, नेत्रा देशपांडे आदी उपस्थित होते. प्रशांत पितालिया यांनी प्रस्तावना केली. प्राचार्य डॉ. सिमी रेठरेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. स्नेहल नवलखा यांनी आभार मानले.

एस. ऋषिकेश म्हणाले, "रुग्णसेवेसाठी अहोरात्र झटणाऱ्या जगातील प्रत्येक परिचारिकेचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. आधुनिक नर्सिंगच्या संस्थापिका लेडी फ्लोरेन्स नायटिंगल यांचा जन्मदिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा साजरा केला जातो.

धनाढ्य कुटुंबात वाढूनही फ्लोरेन्स नाईटिंगेल यांनी आपले जीवन रुग्णसेवेसाठीसमर्पित केले. आधुनिक सुश्रुषा पद्धती विकसित केल्या. नर्सिंग क्षेत्राला प्रतिष्ठा मिळवून दिली. आई आपल्याला घडवते. मातृदिनाच्या निमित्ताने आईप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. हे दोन्ही दिवस एकत्र येणे हा दुग्धशर्करा योग आहे."

सूर्यदत्त कॉलेज ऑफ नर्सिंग, पॅरामेडिकल सायन्स अँड टेक्नॉलॉजी येत्या २०२४-२५ पासून सुरु होत आहे. बारापेक्षा अधिक रुग्णालयांशी आपण सध्या जोडले गेले असून, यातून मुलामुलींना प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. नर्सिंगसह इतर पॅरामेडिकल वैद्यकीय सेवा शिकवणारे अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहेत. लवकरच या अभ्यासक्रमाची सुरुवात सूर्यदत्त कॉलेजमधून होणार आहे. त्यातून वैद्यकीय सेवा सक्षम होण्यासाठी लागणारे मनुष्यबळ तयार होण्यास यामुळे मदत होईल.

- प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, संस्थापक अध्यक्ष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन

## वर्चस्वाच्या वादातून कोयत्याने वार करून तरुणाचा खून

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वर्चस्वाच्या वादातून टोळक्याने एका मुलावर हल्ला केल्याची घटना कोथरूड भागातील डहाणूकर कॉलनी परिसरात शुक्रवारी रात्री घडली. त्यावेळी टोळक्याच्या तावडीतून सुटलेल्या मुलाच्या मित्रावर कोयत्याने वार करून खून करण्यात आला. याप्रकरणी गुन्हे शाखा आणि अलंकार पोलीस ठाण्यातील तपास पथकाने आरोपींना ताब्यात घेतले. श्रीनु शंकर विसलवात (वय 22, रा. लक्ष्मीनगर वसाहत, डहाणूकर कॉलनी, कोथरूड) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत एका मुलाने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. श्रीनु आणि त्याचा मित्र शुक्रवारी रात्री डहाणूकर कॉलनी परिसरात गप्पा मारत थांबले होते. त्यावेळी दुचाकीवरुन पाच ते सहाजण आले.

## राक्षसी कृत्य करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

शहरामध्ये अमानवीय घटना घडली आहे. पत्नीवर संशय घेणाऱ्या पतीने पत्नीच्या गुप्तांगाच्या बाजूला होल पाडून कुलूप बसवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पोलीसदेखील चक्रावले आहेत. याप्रकरणी 30 वर्षीय आरोपी पतीला अटक करण्यात आली असून 28 वर्षीय पीडीतेवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवार दिनांक 11 मे रोजी सतत संशयाच्या भोवऱ्यात असणाऱ्या पत्नीला आरोपी पतीने बेदम मारहाण केली. आधी ब्लेडने गुप्तांगावर वार केले. दोन्ही हात पाय बांधून लोखंडी खिळ्याने गुप्तांगाला दोन्ही बाजूने होल पाडले. तिथं पितळी कुलूप बसवलं असल्याचं पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटलं आहे.

अमानवीय आणि राक्षसी कृत्याबद्दल पीडीतेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. या घटनेप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

# श्रीलंकेत युपीआय पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी फोनपे लंकापेसह संलग्नित होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फोनपेने कोलंबो येथे झालेल्या एका भव्य कार्यक्रमात लंकापेसह लंका व्यापारी पॉइंट्सवर युपीआय पेमेंट्सला प्रोत्साहन देत असल्याचे आज जाहीर केले आहे. या कार्यक्रमाला श्रीलंकेतील भारताचे उच्चायुक्त श्री. संतोष झा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, त्यांनी भारत आणि श्रीलंका यांच्यातील एकूण कनेक्टिव्हिटीमध्ये फिनटेक कनेक्टिव्हिटीने बजावलेल्या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. या कार्यक्रमासंबंधी बोलताना, सेंट्रल बँक ऑफ श्रीलंकाचे गव्हर्नर डॉ. नंदलाल वीरासिंघे यांनी, नवीन संधी अनलॉक करण्याची आणि स्पर्धात्मकता वाढवण्याची आणि श्रीलंकेच्या व्यापाऱ्यांना होणारे फायदे यामधील सहकार्याच्या क्षमतेला दुजोरा दिला.



लंकापेच्या सीईओ चन्ना डीसिल्वा यांनीही श्रोत्यांशी संवाद साधला आणि 'श्रीलंकेतील डिजिटल पेमेंट्सचे भविष्य: श्रीलंकन व्यवसायांसाठी संधी' या विषयावरील अभ्यासपूर्ण पॅनेल चर्चेचे संचालन केले, यामुळे स्थानिक व्यवसायांच्या शक्यता आणि विकास मार्गावर लक्ष केंद्रित केले. श्रीमती शशी कंदांबी, जीएम/सीईओ, नॅशनल सेव्हिंग बँक; श्री. संजय विजेमाने, सीओओ, हॅटन नॅशनल बँक पीएलसी; श्री कॉनरॅड डायस, अध्यक्ष, एलओएल्सी वित्त पीएलसी ; आणि सुश्री रेणुका फर्नांडो, अध्यक्ष, डायलॉग फायनान्स पीएलसी आदी या सत्राचे वैशिष्ट्य होते, यांनी व्यवसाय डिजिटल पेमेंट तंत्रज्ञानाचा फायदा कसा घेऊ शकतो आणि विकसित होत असलेल्या आर्थिक परिदृश्यात स्पर्धात्मक राहण्यासाठी व्यापक बाजारपेठेत कसे प्रवेश करू शकतो यावर चर्चा केली.पॅनेल चर्चेनंतर, फोनपेमधील आंतरराष्ट्रीय पेमेंट्सचे सीईओ रितेश पै यांनी जागतिक बाजारपेठेसाठी युपीआय आणि व्यापाऱ्यांसाठी ते ऑफर करत असलेल्या वाढीच्या शक्यतांबद्दल सखोल माहिती दिली.

या कार्यक्रमात बँकिंग क्षेत्रातील वरिष्ठ प्रतिनिधी, पेमेंट सिस्टम प्रदाते आणि पर्यटन क्षेत्र आणि व्यावसायिक संघटनांच्या प्रतिनिधींसह श्रीलंकेच्या आर्थिक क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या भागधारकांची उपस्थिती होती. NPCI इंटरनॅशनल पेमेंट्स लिमिटेड (NIPL) सह लंकापेच्या भागीदारीद्वारे ही हे एकत्रीकरण सुलभ झाले आहे.

कार्यक्रमादरम्यान फोनपेने घोषणा केली, की श्रीलंकेला प्रवास करणारे त्यांचे ॲप युजर आता देशभरातील लंकापे क्युआर व्यापाऱ्यांकडे युपीआय वापरून पेमेंट करू शकतात. रोख रक्कम बाळगायला नको की चलनाची मोजदाद ठेवायला नको, युजर आता केवळ लंका क्यूआर कोड स्कॅन करू शकतात.

चलन विनिमय दर दाखवून त्यांच्या खात्यातून भारतीय रुपयांमधून डेबिट केले जाईल. हे व्यवहार युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस आणि लंकापे नॅशनल पेमेंट नेटवर्कद्वारे सोपे करून दिले जातात.

याप्रसंगी बोलताना, श्रीलंकेतील भारताचे उच्चायुक्त श्री संतोष झा यांनी म्हटले की, "युपीआय लाँच हे दोन्ही देशांसाठी डिजिटल भागीदारीद्वारे सहकार्य करण्याच्या मोठ्या उद्दिष्टाचा एक महत्त्वाचा भाग आहे." तसेच त्यांनी हेही नमूद केले की, "भारत श्रीलंकेला त्याच्या युनिक डिजिटल आयडेंटिटी प्रोग्रामच्या विकासासाठी आणि डिजिटल स्टॅकच्या इतर घटकांच्या विकासासाठी देखील मदत करत आहे ज्यात श्रीलंकेसाठी आणि द्विपक्षीय आर्थिक भागीदारीसाठी प्रचंड परिवर्तनाची क्षमता आहे."

फोनपेच्या आंतरराष्ट्रीय पेमेंट्सचे सीईओ रितेश पै पुढे म्हणाले, "आम्ही लंकापेसोबत भागीदारी करताना आनंदी आहोत. या भागीदारीमुळे भारतीय पर्यटकांना त्यांच्या प्रवासात नेहमीची आणि सुरक्षित पेमेंट पद्धत उपलब्ध करून दिली जाणार आहे आणि लंकाQR व्यापारी पॉइंट्सवर पैसे देऊ शकणार आहेत. फोनपे पेमेंटमध्ये नेहमीच नावीन्य आणत असते. संपूर्ण भारतभर युपीआय ला स्वीकृती मिळाल्याचा आम्हाला कमालीचा अभिमान वाटतो आणि श्रीलंकेत आमचा विस्तार हे आणखी एक रोमांचक पाऊल आहे."

लंकापेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चन्ना डीसिल्वा पुढे म्हणाले, "श्रीलंका आणि भारत यांच्यातील सीमापार पेमेंटमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी फोनपेसह संलग्नित होताना लंकापेला आनंद होत आहे. ही भागीदारी फोनपे अॅपद्वारे श्रीलंकेतील सर्व लंका क्यूआर व्यापारी पॉइंट्सवर सतत युपीआय । पेमेंट करण्यासाठी भारतीय पर्यटक आणि व्यावसायिक प्रवाशांना उत्तम सुविधा देईल. आम्ही या संलग्नितेच्या संभाव्यतेबद्दल उत्सुक आहोत ज्यामुळे भारतीय पर्यटक आणि व्यावसायिक प्रवाशांना त्यांच्या श्रीलंकेतील वास्तव्यादरम्यान पेमेंटचा उत्तम आनंद मिळणार आबे आणि व्यापाऱ्यांना कार्ड पेमेंटसाठी किफायतशीर प्रस्तावही मिळेल. नावीन्य हा या युतीचा आधारस्तंभ असेल आणि त्यामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होतील असेही मला वाटते."

# फ. मु. यांच्या कवितेतून विश्व कारुण्याचे, त्रिकाल सत्याचे दर्शन

## भारत सासणे यांचे प्रतिपादन; डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ व न्यू ईरा पब्लिशिंग हाऊसतर्फे 'त्रिकाल' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**पिंपरी/पुणे (दै. आरंभ पर्व)** "मानवाच्या अंतर्मनात डोकावण्याची ताकत कवीमध्ये असते. त्याचा ठाव घेत काळजातून आलेली कविता जगण्याची प्रेरणा देते. फ. मु. शिंदे यांच्या कवितांमध्ये विश्व कारुण्य, त्रिकाल सत्याचे दर्शन घडते. वाट पाहण्याची, सहनशीलतेची क्षमता असणाऱ्या फ. मु. यांच्या कवितेत मानवी जीवनाचे प्रतिबिंब आहे. रसिकांना घडवण्याचे, समृद्ध करण्याचे काम यातून होत आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ कथा-कादंबरीकार व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांनी केले.



न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस प्रकाशित कविवर्य फ. मु. शिंदे यांच्या 'त्रिकाल' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी कवी फ. मु. शिंदे, लीलाताई शिंदे, वात्रटीकाकार रामदास फुटाणे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, लेखक-समीक्षक डॉ. रमेश वरखेडे, प्रा. डॉ. राजशेखर शिंदे, प्रकाशिका अमृता तांदळे व्यासपीठावर होते. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस यांच्या सहकार्याने आयोजित कार्यक्रमावेळी सभागृहात साहित्यिक राजन लाखे, 'मसाप'च्या प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, वि. दा. पिंगळे, कवयित्री डॉ. संगीता बर्वे, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, संवाद पुणेचे सुनील महाजन, माधव राजगुरू यांच्यासह साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

डॉ. पी. डी. पाटील म्हणाले, "फ. मु. शिंदे यांनी मराठी साहित्य क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले आहे. त्यांच्या 'आई' या कवितेने महाराष्ट्रातील प्रत्येक रसिकाला भारावून टाकले आहे. सामान्य माणूस, शेतकरी, कष्टकरी यांना जोडणारा, समाजभान असलेला हा कवी आहे. त्यांच्या विचार व भावविश्वाची ओळख रसिकांना होते. सामाजिक भाष्य करणाऱ्या, विद्रोहाची मांडणी असलेल्या या कविता आहे. वैचारिक व चिंतनशील स्वरूपाच्या या रचना समाजाला प्रबोधनपर असून, रसिकांना अंतर्मुख करायला लावतात. रसिकांशी संवाद करणारी त्यांची कविता आहे."

फ. मु. यांनी आपल्या मिश्किल शैलीत कार्यक्रमाचे निरीक्षण नोंदवले. ते म्हणाले, "कवीने समाजाचे भावविश्व शब्दांत गुंफावे. आजवरच्या जगण्यात अनुभवलेले भवताल, समाजातील विविध घटना, प्रसंग टिपण्याचा प्रयत्न 'त्रिकाल' काव्यसंग्रहातून केला आहे. तुमचे सांगायचे राहून गेलेले असते, ते कवी मांडतो. रसिक आणि कवी यांच्यातील अनुबंधाचा भाग कविता असते." यावेळी त्यांनी सादर केलेल्या 'आई', 'मनासारखे जगण्यास आता मन होत नाही', 'खोटे चालते पुढे, पाय मोडला खऱ्याचा' व 'पी. डी. पाटील' या कवितांना रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

रामदास फुटाणे म्हणाले, "औद्योगिक नगरीला साहित्यनगरी करण्याचे काम पी. डी. सरांकडून होत आहे. फ. मु. यांच्या ओठांत खट्याळपणा, तर हृदयात संवेदनशीलपणा आहे. राजकारण इतके विचित्र आहे की साहित्यिकांनी बोलावे की नाही, अशी स्थिती आहे. वात्रटिकांचे उद्गाते पाडगावकर आणि फ. मु. आहेत. कवी, साहित्यिकांनी निडरपणे आपल्या भूमिका मांडायला हव्यात."

प्रा. डॉ . राजशेखर शिंदे म्हणाले, "एकूण 254 तुकड्यांत मांडलेले 'त्रिकाल' हे कवीचे, समाजाचे चरित्र आहे. दंश, डंख, विखारी अनुभव कविमनाला प्रश्न करतात. उत्तरांचा शोध घेत अभिजात प्रवृत्तीचे दर्शन घडविण्याचे काम कवी 'त्रिकाल'मध्ये करत आहे. मिश्किल स्वभावाचे असलेले फ. मु. कवी म्हणून तितकेच संवेदनशील, सामाजिक भान, कारुण्यभाव असलेले व्यक्तिमत्व आहे."

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, "छंदाचे, लयीचे अनेक प्रयोग करणारे कवी आज कमी झाले आहेत. डोळ्यांत अंजन घालणाऱ्या काव्याची निर्मिती व्हावी. फ. मु. आणि रामदास फुटाणे यांनी मराठी कविता सर्वदूर पोहोचवण्यात योगदान दिले आहे. राजकारण्यांचा, समाजाचा तोल ढळतो, तेव्हा सावरण्याचे काम कवी करत असतो. वैभवशाली मराठी साहित्याचे दर्शन घडवण्याचे काम पी. डी. पाटील करीत आहेत."

डॉ. रमेश वरखेडे म्हणाले, "त्रिकालची गुणात्मक व्याप्ती ही तुकोबांच्या गाथा इतकी विशाल आहे. भावविश्वाचा सर्वांगाने घेतलेला आढावा या काव्यसंग्रहात दिसतो. अनुभव छटांची रांगोळी जणू यामध्ये दिसते." ज्यांनी 'आई' ही कविता रचली, त्यांच्याच वाणीतून ती ऐकणे, हा मणिकांचन योग असल्याची भावना रसिकांनी व्यक्त केली.

अमृता तांदळे यांनी प्रास्ताविक केले. समाजाला घडवणाऱ्या साहित्यकृती प्रकाशित करून त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचे काम न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस करत राहील, असे त्यांनी नमूद केले. गायिका प्रांजली बर्वे यांच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात, तर पसायदानाने सांगता झाली. प्रा. प्रतिमा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

# थोडक्यात

## उद्योगातील तज्ञांकडून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र

**पुणे (आरंभ पर्व) :** सिंबायोसिस स्कील्स अॅन्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी तर्फे किवळे कॅम्पस येथे शनिवारी 18 मे 2024 रोजी सायंकाळी 4 ते 6 या वेळात विशेष मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.अभियांत्रिकी,व्यवस्थापन,आर्किटेक्चर ,डेटा सायन्स,ब्युटी अॅन्ड वेलनेस या क्षेत्रातील उद्योगातील तज्ञ मार्गदर्शन करतील.विद्यार्थ्यांना आपल्या करिअरबाबत माहितीपूर्ण निर्णय घेता यावा यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल.नोंदणीकरिता 7796638369/7796695604 / 7796638376 येथे संपर्क साधावा.

## वैद्यकिय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ताची भूमिका या विषयावर परिसंवाद

**पुणे (आरंभ पर्व) :** डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र पिंपरी पुणे येथे नुकतेच संस्थेच्या आंतरराष्ट्रीय विभागातर्फे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि बायोएथिकल डीलेमाज' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयमुळे झालेल्या प्रगतीचे मूल्यमापन या विषयावर आयोजित या परिसंवादासाठी आरोग्य सेवा क्षेत्रातील अनेक तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्यसेवा क्षेत्रामधील एआय तंत्रज्ञानाच्या एकंदरीत अभ्यासातून वैद्यकीय हित साध्य करण्याच्या दृष्टीने या तंत्रज्ञानाची सद्यस्थितीतील गरज ओळखून आरोग्य क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. एआयमुळे जागतिक स्तरावर आरोग्यसेवा क्षेत्रात कसे बदल घडत आहेत यावर या क्षेत्रातील व्यावसायिकांना, तज्ज्ञांना सखोल संवादाची उत्तम संधी या कार्यक्रमामुळे मिळाली. तसेच तसेच याच्या वापरामुळे होणारे सकारात्मक व नाकारात्मक परिणामावर विचार मंथन झाले.

# 'क्रॉम्प्टन'ने शाश्वत ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या क्षेत्रात मिळविली आघाडी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)** ऊर्जाबचत करणाऱ्या व शाश्वत ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या आपल्या विस्तृत श्रेणीसाठी वाखाणल्या जाणाऱ्या क्रॉम्प्टन ग्रीव्हज कन्झ्युमर इलेक्ट्रिकल्स लि. या कंपनीने पर्यावरण, सामाजिक आणि प्रशासकीय (ईएसजी) क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी डाऊ जोन्स सस्टेनेबिलिटी इंडेक्समध्ये (डीजेएसआय) उच्च स्थान प्राप्त केले आहे. 'क्रॉम्प्टन'ला जागतिक टक्केवारीत 94वे स्थान मिळाले असून 'डीएचपी हाउसहोल्ड ड्युरेबल्स' क्षेत्रातील इतर कंपन्यांमध्ये 7वे स्थान मिळाले आहे. 'क्रॉम्प्टन'ची शाश्वत कार्यपद्धतींप्रतीची समर्पितता आणि उद्योगक्षेत्राच्या नेतृत्वपदी कंपनीचे स्थान अधिक ठळकपणे अधोरेखित करणारे हे यश आहे.

1999 साली स्थापन झालेला 'डाऊ जोन्स सस्टेनेबिलिटी इंडेक्स' हा जगभरातील हजारो कंपन्यांच्या शाश्वततेच्या आघाडीवरील कामगिरीचे मूल्यमापन करणारा एक मापदंड आहे.

'डीजेएसआय'च्या कठोर मूल्यमापन प्रक्रियेमध्ये कंपन्यांचे आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक निकषांवर परीक्षण केले जाते व त्यात दीर्घकालीन शाश्वततेवर भर दिला जातो. उदाहरणार्थ, या 'डीजेएसआय वर्ल्ड'द्वारे 'एस अँड पी ग्लोबल ब्रॉड मार्केट इंडेक्स'मधील सर्वात मोठ्या 2500 कंपन्यांमधील सर्वोत्तम 10 टक्के कंपन्यांची त्यांच्या दीर्घकालीन 'ईएसजी'च्या' निकषांनुसार दखल घेतली जाते.

'क्रॉम्प्टन'ने यावर्षी 'डीजेएसआय'मध्ये मिळविलेल्या गुणांमधून कंपनीने महत्त्वाच्या क्षेत्रांतील मिळविलेल्या गुणांकनातील सुधारणा दिसून येते. यामध्ये पर्यावरणीय शाश्वतता, उत्पादनाच्या आघाडीवरील धुरिणत्व, समाजावर मोठा प्रभाव टाकणारे सामाजिक जबाबदारीचे उपक्रम, वैविध्य, कर्मचाऱ्यांचे स्वास्थ, मनुष्यबळ विकास आणि भक्कम प्रशासकीय कार्यपद्धती यांचा समावेश आहे.

शाश्वत विकासाच्या वाटेवरून कंपनीचा प्रवास पुढे सुरू असतानाच सातत्याने सुधारणा आणि नवसंकल्पना राबविण्याप्रती आपली बांधिलकीही कंपनी खंबीरपणे जपत आहे आणि जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व सकारात्मक बदलांना चालना देण्यासाठी नव्या संधींचा शोध घेत आहे.




# 'विषय हार्ड' चित्रपटाचं मोशन पोस्टर प्रदर्शित

**पुणे (दै. आरंभ पर्व)** आज भारतात 'मंजुमल बॉईज' आणि 'अवेशम'सारखे प्रादेशिक चित्रपट गाजत आहेत. ओटीटीवरील 'पंचायत', 'फॅमिली मॅन'सारख्या वेब शो चे विषय लक्षवेधी ठरत असताना मराठी सिनेमाही मागे राहिलेला नाही. मराठीत खूप दिवसांनी फ्रेश कंटेंट असलेला एक भन्नाट सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. महाराष्ट्राच्या लाल मातीचा सुगंध लाभलेला आणि शहरी भागातील प्रेक्षकांनाही धरून ठेवणारा 'विषय हार्ड' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. संगीतप्रधान कथानकाच्या जोडीला एक वेगळंच आकर्षण असलेला मराठी मातीतील रांगडा अभिनेता सुमित या चित्रपटाद्वारे सिनेसृष्टीत पदार्पण करत असून, कसलेली अभिनेत्री पर्ण पेठेने आपल्या अभिनयाच्या बळावर या चित्रपटाला एका वेगळ्याच उंचीवर नेलं आहे. 'विषय हार्ड' चित्रपटाचं मोशन पोस्टर नुकतंच रिलीज करण्यात आलं आहे. बर्डबॉय एन्टरटेन्मेंट आणि कोल्हापूर टॉकिज याची निर्मिती असलेल्या 'विषय हार्ड'चे निर्माते गीतांजली सर्जेराव पाटील, सर्जेराव बाबूराव पाटील आणि सुमित पाटील आहेत. चित्रपटाचं दिग्दर्शन करणाऱ्या सुमित यांनीच कथालेखनही केलं आहे. 'चल... चल... चल... पळ... पळ... पळ..., कोण पळतंय पुढे?' असं म्हणत 'विषय हार्ड'चं मोशन पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे.

ग्रामीण-निमशहरी भागातील एका रस्त्यावर एका मागोमाग एक धावणारी माणसं पोस्टरवर दिसतात. त्या सर्वांच्या पुढे एक बाईक आहे. त्यावर एक तरुण आणि तरुणी आहेत. 'पुढे रस्ता बंद आहे', असं लिहिलेला फलक दिसतो आणि 'विषय हार्ड' हे शीर्षक येतं. येत्या जुलै महिन्यात डायरेक्ट थेटरमध्ये असं रांगड्या कोल्हापूरी भाषेत लिहिलं वाक्य 'विषय हार्ड'च्या प्रदर्शनाची घोषणाही करतं. सर्वांच्या पुढे पळणाऱ्या बाईकवर बसले आहेत मुख्य भूमिकेतील पर्ण पेठे आणि सुमित... या चित्रपटाच्या निमित्ताने पर्ण आणि सुमित प्रथमच एकत्र आले असल्याने प्रेक्षकांना एका नव्या कोऱ्या जोडीची ऑनस्क्रीन केमिस्ट्री अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सला प्रतिष्ठित 'लीगल एरा'

## भारतीय कायदेसंमत व्यवहाराचा पुरस्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)** जगातील सहाव्या क्रमांकाचा सर्वात मोठा आभूषण विक्रेता समूह आणि डेलॉइटच्या लक्झरी उत्पादनांच्या जागतिक क्रमवारीत 19 व्या क्रमांकावर असलेल्या, मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने सनदशीर व्यवहार श्रेणीतील देशातील प्रतिष्ठित 13 व्या वार्षिक लीगल एरा - भारतीय कायदेसंमत व्यवहार पुरस्कार पटकावला आहे. कायदेसंमत उत्कृष्टता आणि नैतिक व्यवसाय पद्धतींबद्दल कंपनीची बांधिलकी अधोरेखित करून कंपनीला प्रतिष्ठित 'कम्प्लायन्स अँड रिस्क मॅनेजमेंट टीम ऑफ द इयर 2023-24' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

स्पर्धात्मक रुपात आदित्य बिर्ला समूह, हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड, ह्युंडाई मोटर्स इंडिया लिमिटेड, आयटीसी लिमिटेड, मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड, टाटा केमिकल्स, टाटा स्टील मिनी लिमिटेड, टाटा केमिकल्स, एलटीआय माइंड ट्री आणि इतर अनेक प्रतिष्ठित उद्यम संस्थांना मात देत मलाबार गोल्ड अँड डायमंड्स या पुरस्काराची मानकरी ठरली आहे. पुरस्काराने मिळवून दिलेली मान्यता ही अनुपालन आणि जोखीम व्यवस्थापनाच्या क्षेत्रात कंपनीच्या अनुकरणीय कामगिरीवर प्रकाश टाकते, जी उद्यम सुशासनाच्या कॉर्पोरेट गव्हर्नन्सची सर्वोच्च मानकांना शिरोधार्य मानणाऱ्या तिच्या समर्पण आणि बांधिलकीचा प्रत्यय देणारी आहे. भारताचे माजी सरन्यायाधीश दीपक मिश्रा, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बीएन श्रीकृष्ण, न्यायमूर्ती अर्जन सिक्री आणि न्यायमूर्ती दीपक वर्मा यांसारख्या कायदेशीर दिग्गजांचा समावेश असलेल्या प्रतिष्ठित परीक्षण मंडळाच्या देखरेखीखाली पुरस्कार निवड प्रक्रियेने मलाबार गोल्ड आणि डायमंड्सच्या कायदेसंमत व्यवहारातील अपवादात्मक योगदानाला अधोरेखित केले.

हॉटेल ताज पॅलेस, नवी दिल्ली येथे झालेल्या एका समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, ज्यामध्ये भारताचे माजी सरन्यायाधीश दीपक मिश्रा, दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनमोहन आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती प्रतिभा सिंग यांच्यासह दिग्गजांनी उपस्थिती लावली होती.



मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे प्रतिनिधित्व करताना, उपाध्यक्ष केपी अब्दुल सलाम, कायदेशीर आणि उद्यम व्यवहार विभागाचे समूह प्रमुख राजीव नायर आणि कंपनी सेक्रेटरी सी. आशिक यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

कंपनी सेक्रेटरी स्तरावर चालवले जाणारे नेतृत्वदायी उपक्रम आणि कायदेशीर अनुपालनाबाबतची सावधगिरी यामुळे कंपनी या पुरस्कारासाठी पात्र ठरली आहे. नैतिक व्यवसाय पद्धती, पारदर्शक आणि व्यावसायिक निधी व्यवस्थापन आणि ईएसजी तत्त्वांवर आधारित व्यवसाय योजनांमुळे कंपनीला देशातील इतर मोठ्या कॉर्पोरेट्सच्या तुलनेत अनुपालन आणि जोखीम व्यवस्थापन संघ श्रेणीमध्ये पुरस्कार जिंकण्यासाठी पात्र ठरवण्यात आले आहे.

पुरस्काररूपी मान्यता मिळाल्याबद्दल, मलाबार समूहाचे अध्यक्ष, एमपी अहमद यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली की, "आम्हाला या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल खूप आनंद आणि अभिमान वाटत आहे. कंपनी सचिवांच्या नेतृत्वाखाली होत असलेले उत्कृष्ट कार्य कौतुकास्पद आहे. आमचे ध्येय, 'मेक इन इंडिया, मार्केट टू द वर्ल्ड' असे असून, रोजगाराच्या संधी निर्माण करून आणि कठोर अनुपालन मानकांचे पालन करून देशाच्या समृद्धीमध्ये योगदान देण्याप्रती आमचे समर्पण यातून अधोरेखित होते."

मलाबार गोल्ड अँड डायमंड्स सर्व नियामक आवश्यकतांचे पालन सुनिश्चित करून आणि व्यावसायिक संस्था, वित्तीय संस्था आणि सरकारी नियामकांशी पारदर्शक संबंध वाढवून, जागतिक स्तरावर कार्यरत आहे. एक जबाबदार आभूषण व्यावसायिक म्हणून, कंपनी केवळ सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करून, सोन्याचा स्त्रोत हा कायदेशीर आणि जबाबदार खाणींमधून असेल असा आग्रह धरते. कंपनी कार्यरत असलेल्या प्रत्येक अधिकारक्षेत्रात स्थानिक कायदे आणि कर विषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करून, मलाबार गोल्ड आणि डायमंड्स ही सेवा देत असलेल्या देशांच्या सामाजिक-आर्थिक विकासात योगदान देण्यासाठी वचनबद्ध आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.